# ‘बुकगंगा’वर आजपासून विश्व कविसंमेलन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बुकगंगा डॉट कॉम या वेबसाइटवर आजपासून पहिले विश्व कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे.

गेल्या तीन वर्षात बुकगंगा डॉट कॉमवर अनेक लेखकांची, प्रकाशकांची, भारतीय भाषांमधील एक लाखापेक्षा जास्त पुस्तके घरपोच वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सुमारे १० हजार ई-बुक्सचा खजिनाही उपलब्ध आहे. मागील वर्षी प्रथमच ऑनलाईन विश्व साहित्य संमेलनाची सुरुवात केल्यानंतर बुकगंगा डॉट कॉम ही वेबसाईट आता ऑनलाईन विश्व कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी साहित्याचा प्रचार आणि प्रसार करणे, जगभरातील नवोदित मराठी कवी, साहित्यिक, लेखक, ब्लॉगर, वाचक ह्यांना एकत्र आणणे आणि या सर्वांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जपानपासून अमेरिकेपर्यंत स्थायिक विविध देशातील, शंभरहून अधिक मराठी मंडळे आणि संस्थाद्वारे प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमध्ये लिहिणाऱ्या लेखक, कवींना एकत्र आणणे, जगभरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या मराठी शाळांतील, पुढच्या पिढीतील विद्यार्थ्यांना संमेलनात सहभागी करून घेणे, मायमराठीतील साहित्याची गंगा जगभर पोहचविणे, अशी या संमेलनाची उद्दिष्टे आहेत. ११ दिवस चालणाऱ्या ऑनलाईन कवी संमेलनात, जगभरातील कवी आपल्या कविता बुकगंगा.कॉमच्या फेसबुक वरील पेजवर पोस्ट करतील. तसेच, जगभरातील विविध कवी, लेखक, वाचक, साहित्यिक एकमेकांशी संवाद साधतील, अशी माहिती बुकगंगाचे संस्थापक मंदार मोरेश्वर जोगळेकर यांनी दिली. अधिक माहितीसाठी संपर्क - www.bookganga.com, मोबाइल - ९८८११२४३४१